# मेट्रो ३ स्थानकांपर्यंत खाजगी मालमत्तेतून प्रवेशाची परवानगी मिळणार

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेच्या सहा स्थानकांमध्ये थेट खाजगी मालमत्तेच्या भुयारी मार्गाने प्रवेशाची परवानगी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून देण्यात येणार असून, संबंधित मालमत्तांचा वापर करणाऱ्यांकडून शुल्क आकारण्यात येणार आहे. या मार्गाचा वापर खाजगी गुंतवणूकदार, जाहिरातदार तसेच सुरक्षारक्षक व सेलिब्रीटी यांनाही करता येणार आहे.

एमएमआरसीएलने कुलाबा ते सिप्झदरम्यान सहा मेट्रो स्थानकांची निवड या विशिष्ट भुयारी मार्गासाठी केली आहे. यामध्ये मरोळ नाका, बीकेसी, धारावी, दादर, वरळी आणि विज्ञान संग्रहालय या स्थानकांचा समावेश आहे. प्रवेश भूमिगत असल्याने मेट्रो स्थानक आणि खाजगी मालमत्तेमधील अंतर कापण्यासाठीची लांबी कमी होणार आहे. एखाद्या स्थानकावर मालमत्तेवर सार्वजनिक प्रवेश ठिकाणापासून प्रवेश केल्यास ते बाहेर पडण्याच्या ४८० मीटर अंतरावर असणार आहे. मात्र, खाजगी प्रवेशामुळे ३०० मीटरपर्यंत कमी करणे शक्य होणार आहे. भुयारी मार्गासाठी प्रति मीटर २० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. यापूर्वी नोव्हेंबर २०१९ मध्ये एमएमआरसीने मेट्रो आरखड्याच्या बाजूने मालमत्ता आणि मालमत्ता मालकांकडून स्वारस्य तपासण्यासाठी आमंत्रण दिले होते. त्यानंतर पहिल्या टप्प्यात आठ मालमत्ता निश्चित करण्यात आल्या. मात्र, आता पुढील काही आठवड्यांमध्ये पुन्हा एकदा निविदा मागवण्यात येणार आहेत. या मालमत्ताधारकांकडून एकरकमी २ कोटी रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. यामुळे प्रकल्पाला अतिरिक्त सुविधा किंवा ऑपरेशन आणि देखभालीचा खर्च पूर्णपणे भुयारी मार्गाचे विशेषाधिकार मिळणार आहे.

ज्या मालमत्ता मालकांनी उत्सुकता दर्शवली आहे, ते एमएमआरसीएलच्या बांधकामाचा खर्च उचलतील, असेंही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. आपत्तीच्या काळात प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी तसेच इतर कारणांसाठी खाजगी भुयारी मार्गांचा वापर करण्याची परवानगी देण्याचा अधिकार एमएमआरसीएलला असणार आहे.